PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gan Gavlan
Year: 1969

Song: Aik Sajani Nari Jatichya
Lyricist: Jagdish Khebudkar

ऐक साजणी नारी जातीच्या
सौभाग्याच्या पाच खुणा....
सौभाग्याच्या पाच खुणा आ.....
पाच प्रश्नांचं उत्तर ऐकून
तुझा बघु दे चतुरपणा
गं गं गं माझे बाई

अगं चतुरपणाची नौबत जडली
लई कौतुक हे बरं न्हवं आ....
लहान तोंडी मोठया घासाचं
धाडस कारण खरं न्हवं
गं गं गं माझे बाई

अगं नार केळीच्या कोंबावानी
जगात सारी म्हणती गं आ....
मग कोमल चरणी भारी वजनाच्या
साखळया कशाला घालती गं
गं गं गं माझे बाई

अयं
असायं आमचा पहिला प्रश्न
जमत असंल तर दया उत्तर
नाहीतर हाणा गाडी
असं ऐका
आरं चतुरपणाचा उजेड दिसला...
पाच तुझ्या या प्रश्नानं...
आनं नारी जातीच्या पतीव्रत्याला
आज दिलं तू आव्हान
रं रं रं राजा

आरं पतिव्रतेला अलंकार हे
लाख मोलाचे आसती रं....
आनं सौभागयाच्या पाच खुणांची
ऐक सांगते महती रं....
आरं माझ्या राजा
आरं माझ्या राजा
आरं माझ्या राजा
हे....
आ........
भोळया भाबडया नारी जातीनं
रस्ता धरूनी तेढा रं
रस्ता धरूनी टेढा रं

मान मर्यादा यावी अंगी
धाक बसावा थोडा रं...
धाक बसावा थोडा रं...
पाय धरावा एका जागी
पाय धरावा एका जागी
असा घातला खोढा रं
असा घातला खोढा रं

म्हणून चांदीच्या साखळया करूनी
पायी नारीच्या घालती रं....
म्हणून चांदीच्या साखळया करूनी
पायी नारीच्या घालती रं....
अहो पहिलं उत्तर पारखून घ्यावं
खऱ्या कसोटीवरती रं....

आगं टिचभर आपल्या बात बुध्दीची

खोटी बढाई मारू नको आ...
असन वारीच्या अकलेवरती
व्यापार असला करू नको
गं गं गं बाई

आग चवळी वानी तू लवचिक भारी
नार जशी शेलाटी गं आ....
मग नाजूक हाती हिरव्या चुडयाची
कशाला अडचण करती गं
गं गं गं बाई आगं माझे बाई

अहो दुसरं उत्तर हिरव्या चुडयाचं...
ऐक सांगते आता तुला आ...
नारी जातीला अवगत झाली
बृहस्पतिची खरी कला
आ.... रं रं रं
ओ
लगीन राजा होता माहेर सोडून
नारी सासरी येतात
अहो नाही सासरी येतात

जीवाभावानं सेवा करते
जीवाभावानं सेवा करते
कंकव बांधून हातात
बाई कंकण बांधून हातात
कंकण बांधून हातात
बाई कंकण बांधून हातात
सावधगिरीचा देत इशारा
चुडा बोलतो कानात
बाई चुडा बोलतो कानात
भरला संसार रंगून जावा

भरला संसार रंगून जावा

हिरव्या चुडयाच्या रंगात
बाई हिरव्या चुडयाच्या रंगात
घरची लक्ष्मी अहो भरल्या चुडयानं
दान देऊ दे दुसऱ्याला
घरची लक्ष्मी अहो भरल्या चुडयानं
दान देऊ दे दुसऱ्याला
म्हणून हाती हिरव्या रंगाचा
चुडा घालते नारीला रं....

आगं नकोस दिवू नखरा तोरा
वाऱ्यावरती पदरं उडं आ...
आमची किर्ती दाही दिशाला
बाईची अक्कल चुलीपुढं गं गं गं बाई
आगं पद्मिनी वानी नार गोरटी
निताळपण हे कळलं गं आ....
मग गोऱ्या गळयामधी काळया मण्याचं
कशाला बांधती डोरलं गं...
गं गं गं बाई आगं माझे बाई

तिसरं उत्तर काळया मण्याचं
ऐक उलगडा करते रं...
सौभाग्याच्या अधिकाराची
ऐक थोरवी गाते रं....
रं रं रं राजा

आ...
नव्या नवरीचं रूप घेऊनी...
लक्ष्मी येते पायगुणी
मंगल हाती तिच्या गळयाला

Literacy for a Billion

मंगल हाती तिच्या गळयाला
बांधते डोरलं सुवासिनी

बांधते डोरलं सुवासिनी
सासर माहेर दोन मणी अन्
तुलशीला त्या तिसरा मणी
संसाराचा चौथा आणिक
पतिदेवांचा पाचवा मणी
पाच मण्यांच्या पाच प्रतिष्ठा
जिवापाडं ती जपते रं....
अहो
पाच मण्यांच्या पाच प्रतिष्ठा
जिवापाडं ती जपते रं....
डोरलं बांधून नवी नवरी
सुवासिनी ती ठरते रं...

आज कालच्या मर्द गडयांनी
लई चढीवलयं नारीला आ...
डाव पेचानं तुला पकडूनी
थांब गं आणतो जेरीला
गं गं गं बाई

आगं गुलाब फुलला गाली ओठी
सुंदरतेची तू मूर्ती आ...
मग चाफकळीच्या नाकामधी
नथीचं ओझं का ठेवी
गं गं गं बाई आगं माझे बाई

ऐक नथीचं चौथं उत्तर
इचार करशी कसला रं...
पेचामागून पेच तुझा हा
चुटकीसरशी सुटला रं...
रं रं रं राजा

आ ...
तिन्ही त्रिकाळ नारी जातीनं
अहो पट्टा तोंडाचा सोडू नये
वाईट वगाळ बोलून आपली
अहो नाती गोती तोडू नये
तिच्या व्हटाला अडसर यावा
भलतं सलतं घडू नये अहो
तिने बोलावं मर्यादेनं
फशी कुणाला पडू नये अहो

म्हणून नथेचं कुलूप लावूनी
बंदोबस्त हा केला रं...
अहो म्हणून नथेचं कुलूप लावूनी
बंदोबस्त हा केला रं...

घोडा मैदानं जवळी आलं
निकालं आता ठरला रं....

अक्कडबाजी प्रश्न टाकतो
फक्कड दयावं उत्तर गं आ...
बरोबरीची पर्वा नाही
हरलो तरीही बेहत्तर गं...
गं गं गं माझे बाई.

अगं कलंक नाही दागटी नाही
अशी थोरवी गाती गं आ...
मग रूंद कपाळी टिळयाएवढं
कुंकू कशाला लेती गं...

Literacy for a Billion

गं गं गं माझे बाई
माझे बाई माझे बाई ऐका
पाचवं उत्तर ऐकायाला
आतुर झाली सारी रं...

उभ्या जगाला पुरून उरलो
आम्ही झाशीच्या नारी रं...
रं रं रं राजा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*